महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.२-सी/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## सुधारपत्र क्र. ८३ दिनांक १५ / ११ / २०१९

**(म.रा.वि.वि.कं.मर्या. वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम - २००५)**

**विषय: राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना वेतनगट १, २, ३ व ४ मधील पदावर आरक्षण देणेबाबत.**

संदर्भ: १) सुधारपत्र क्र. २२ दि. ०६.०४.२०१०.
२) सुधारपत्र क्र. ३३ दि. १५.०९.२०१०.
३) सुधारपत्र क्र. ६६ दि. ०७.०४.२०१६.

महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून पारित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. ०१.०७.२०१६ व शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. ११.०३.२०१९ च्या धर्तीवर कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये संचालकांनी विचारविनिमय करून ठराव क्र. १९०० दि. २४.०९.२०१९ अन्वये, राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना कंपनीमधील वेतनगट १, २, ३ व ४ मधील पदांवर ५% समांतर आरक्षण देण्याबाबत आणि त्याबाबतच्या सर्व समावेशक सूचना कंपनीमध्ये अंगीकृत करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

२. सबब, संचालक मंडळ यांनी **ठराव क्र. १९०० दि. २४.०९.२०१९** अन्वये दिलेल्या मंजुरीच्या अनुषंगाने म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम २००५, मधील **परिशिष्ट - 'ढ' (Appendix-L)** अंतर्गत असणाऱ्या तरतुदी अधिक्रमीत करून सोबत जोडलेल्या **जोडपत्र 'अ'** नुसार सुधारीत तरतुदींचा समावेश **परिशिष्ट - 'ढ' (Appendix-L)** मध्ये करण्यात येत आहे.

३. सदरचे सुधारपत्र जारी केल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

४. सदर सुधारपत्र कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत** : जोडपत्र 'अ'

**(कमांडर शिवाजी इंदलकर)**(से.नि.)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**जोडपत्र 'अ'**

## परिशिष्ट 'ढ'

(वाचा : सेवाप्रवेश विनियम क्र. ३८ खालील टिप क्र १(xii))

**राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना वेतनगट १, २, ३ व ४ मधील पदांवर ५% समांतर आरक्षण देण्याबाबतच्या तरतुदी.**

१. **क्रीडा विषयक अर्हता:-**

| वेतनगट | क्रीडा विषयक अर्हता | खेळविषयक पात्रता | |
|---|---|---|---|
| | | वैयक्तिक स्पर्धा | सांघिक स्पर्धा |
| १ | i) अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा (वरिष्ठ गट)<br>ii) पॅरा ऑलिम्पिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा<br>iii) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>iv) आंतरराष्ट्रीय शालेय महासंघा- द्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा<br>v) ग्रॅन्डमास्टर किताब | महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रोप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक ग्रॅन्डमास्टर किताब अथवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग ग्रॅन्डमास्टर किताब अथवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग | महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक/ |
| २ | i) अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा (कनिष्ठ गट)<br>ii) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट)<br>iii) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा<br>iv) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा<br>v) राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>vi) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>vii) आंतरराष्ट्रीय मास्टर किताब | महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना/ महाराष्ट्राचे/ विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक/ अथवा) आंतराराष्ट्रीय मास्टर किताब मिळविणे आवश्यक | महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने/ महाराष्ट्राच्या/ विद्यापीठाचे संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक/ ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग |
| ३ | i) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (कनिष्ठ गट)<br>ii) राज्य स्तरावरील वरिष्ठ क्रीडा स्पर्धा<br>iii) राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा<br>iv) ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>v) राज्यस्तर आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा (अश्वमेध)<br>vi) राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा<br>vii) राज्यस्तर पॅरा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा<br>vii) राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे/ राज्य स्तरावर संबंधित विभाग/ जिल्हयाचे प्रतिनिधित्व करून प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक | राष्ट्रीय स्तरावीरल स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे/ राज्य स्तरावर संबंधित विभाग/ जिल्हयाचे प्रतिनिधित्व करुन संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक |
| ४ | i) राज्यस्तर कनिष्ठ गटातील क्रीडा स्पर्धा | प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक | संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक |
| | ii) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग |
| | iii) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग |

२. पात्र स्पर्धांचा तपशील:-

| वेतनगट १ साठी पात्र क्रीडा स्पर्धा | वेतनगट २ साठी पात्र क्रीडा स्पर्धा |
|---|---|
| **१. अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा :-**<br>i. ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा.<br>ii. एशियन्स गेम्स.<br>iii. जागतिक क्रीडा स्पर्धा.<br>iv. एशियन चॅम्पियशीप.<br>v. कॉमनवेल्थ गेम्स.<br>vi. कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप.<br>vii. युथ ऑलिम्पिक.<br>viii. ग्रॅडमास्टर (बुध्दिबळ) | **वेतनगट १ पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू**<br>**अथवा**<br>**१. अधिकृत आंतरराष्ट्रीय कनिष्ठ गटातील :-**<br>i. ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियशीप<br>ii. युथ कॉमनवेल्थ गेम्स<br>iii. कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप<br>iv. कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप<br>v. आंतरराष्ट्रीय मास्टर किताब (बुध्दिबळ) |
| **२. पॅरॉलिम्पिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा :-**<br>i. पॅरॉलिम्पिक गेम्स.<br>ii. पॅरा एशियन गेम्स.<br>iii. वर्ल्ड पॅरॉलिम्पिक गेम्स. | **२. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट :-**<br>i. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा<br>ii. अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट) |
| **३. जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा :-**<br>i. जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा बोर्डाने आयोजित केलेले खेळ. | **३. पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय स्पर्धा :-**<br>i. पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय अजिंक्य पद स्पर्धा |
| **४. आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा :-**<br>आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारे आयोजित केलेले खेळ. | **४. राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा :-** |
| **५. ग्रॅन्ड मास्टर किताब** | **५. राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा** |
| (**टिप-** उपरोक्त नमूद अ.क्र. १,३,व ४ या क्रीडा स्पर्धांना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धाचा समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच ५% आरक्षणासाठी पात्र राहतील) | **६. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा**<br>**७. आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा**<br>(**टिप-** अ.क्र. १,२,४,५, व ६, या स्पर्धामधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.) |
| **वेतनगट ३ साठी पात्र क्रीडा स्पर्धा** | **वेतनगट ४ साठी पात्र क्रीडा स्पर्धा** |
| **वेतनगट १ व २ मधील पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा** | **वेतनगट १, २ व ३ मधील पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा.** |
| **१. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ठ गट**<br>i) राष्ट्रीय ज्यूनियर गट अजिंक्यपद स्पर्धा | **१. राज्यस्तर कनिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा** |
| **२. राज्य स्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा**<br>i) राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा | **२. वरिष्ठ गटातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धातील सहभाग** |
| **३. राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा** | **३. पॅराऑलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गटातील सहभाग.** |
| **४. राज्यस्तर ग्रामिण व महिला क्रीडा स्पर्धा**<br>**५. राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)**<br>**६. राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा**<br>**७. राज्यस्तर पॅराऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा**<br>**८. राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा**<br>(**टिप-** अ.क्र. १ ते ५ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कब्बडी व खो-खो देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी असतील.) | (**टिप -** अ.क्र. १ व २ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कब्बडी व खो-खो हे नमूद देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र असतील.) |

३. स्पर्धा आयोजक यांचा तपशिल:-

| अ.क्र. | क्रीडा स्पर्धांचे प्रकार | क्रीडा स्पर्धांचे आयोजक |
|---|---|---|
| १ | अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा (वरिष्ठ गट)/ ग्रॅन्डमास्टर किताब/ आंतरराष्ट्रीय मास्टर किताब | ऑलिम्पिक समितीशी संलग्न आंतरराष्ट्रीय फेडरेशन/ आंतरराष्ट्रीय समिती/ इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन |
| २ | आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त इतर स्पर्धा | आंतरराष्ट्रीय अथवा राष्ट्रीय फेडरेशन (खेळाडूची निवड राष्ट्रीय संघातून झालेली असावी) |
| ३ | राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा | भारतीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न राष्ट्रीय फेडरेशन अथवा संघटना |
| ४ | राज्य क्रीडा अजिंक्यपद स्पर्धा | महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न संबंधीत खेळाची राज्य संघटना |
| ५ | राष्ट्रीय स्पर्धा | एकविध खेळ संघटना (इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन (IOA) आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (MOA) ची संलग्नता आणि निकष अनिवार्य) |
| ६ | जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धा | आंतरराष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पोर्टस बोर्ड |
| ७ | अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा | अखिल भारतीय विद्यापीठ क्रीडा बोर्ड |
| ८ | राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध) | संबंधित विद्यापीठ |
| ९ | पॅरा ऑलिम्पिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा | आंतरराष्ट्रीय पॅरा आलिम्पिक समिती |
| १० | आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त इतर पॅरा आलिम्पिक स्पर्धा | आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त संघटना (खेळाडूची निवड राष्ट्रीय संघातून झालेली असावी) |
| ११ | राष्ट्रीय व राज्यस्तर पॅरॉलिम्पिक क्रीडा स्पर्धा | संबंधित पॅरॉलिम्पिक खेळ संघटना |
| १२ | अपंग क्रीडा स्पर्धा | आयुक्त अपंगकल्याण विभाग |
| १३ | आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा | आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा महासंघ |
| १४ | राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा | भारतीय शालेय क्रीडा महासंघ |
| १५ | राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा | क्रीडा व युवक सेवा संचालनालय |
| १६ | महिला व ग्रामीण क्रीडा स्पर्धा (भारतीय खेळप्राधिकरण/ पंचायत युवा व क्रीडा अभियान अथवा राजीव गांधी खेल अभियान अंतर्गत) | १) क्रीडा व युवक सेवा संचालनालय<br>२) भारतीय खेळप्राधिकरण |
| १७ | राज्यस्तर अदिवासी क्रीडा स्पर्धा | आयुक्त अदिवासी विकास विभाग |

**टिप** : आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सांघिक/ वैयक्तिक स्पर्धेमध्ये किमान १२ देशांच्या संघाचा / वैयक्तिक स्पर्धेमध्ये (वैयक्तिक क्रीडा प्रकार/ प्रत्येक वजनी गटात) स्वतंत्रपणे किमान १२ खेळाडूंचा समावेश असावा. सर्व प्रकारच्या राष्ट्रीय / राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये किमान ६०% राज्य/ जिल्हे सहभागी होणे आवश्यक राहील.

४. **सर्वसाधारण अर्हता :-**

(i) खेळाडू हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा व त्याला मराठीचे ज्ञान असावे.

(ii) सदर खेळाडू संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार पदासाठी आवश्यक असणारी किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त करणारा असावा.

(iii) खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणातून सरळसेवेने नेमलेला उमेदवार हा आरक्षण बिंदू नामावलीमध्ये त्या त्या प्रवर्गामध्ये गणला जाईल उदा. अनुसूचित जातीची खेळाडू व्यक्ती ही अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या बिंदूवर गणली जाईल.

(iv) राज्य शासनाच्या सेवेत यापूर्वीच असलेल्या उमेदवारांना त्यांनी क्रीडा क्षेत्रात अधिक वरिष्ठ स्थान अथवा पदक प्राप्त केल्यास व ते शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा इत्यादी बाबींसह पात्र असल्यास वरिष्ठ जागेसाठी ते अर्ज करण्यास पात्र राहतील.

(v) खेळाडू उमेदवाराच्या मुलाखतीवेळी तसेच मुलाखती नसणाऱ्या परीक्षांमधून द्यावयाच्या अंतिम नियुक्तीपूर्वी खेळाडूंकडे संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पात्रतेचा अहवाल असणे बंधनकारक असेल.

(vi) खेळाडूंसाठी विहित करण्यात आलेले सदर ५ टक्के आरक्षण वेतनगट- १, २, ३ आणि ४ या गटातील पदांच्या सरळसेवा भरतीसाठी अनूज्ञेय राहील.

(vii) संबंधीत पदासाठी वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट खेळाडूंसाठी शिथील करण्यात येईल. तथापि वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथील करतांना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल.

(viii) एकाकी पदास आरक्षण लागू राहणार नाही. आरक्षण हे पदनिहाय व वेतनश्रेणीनिहाय असेल.

(ix) समांतर आरक्षण हे कप्पीकृत (compartmentalized) आरक्षण असल्याने त्यातील संवर्गात बदल करता येणार नाही व आरक्षणाचा अनुशेष पुढे नेता येणार नाही. तसेच भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत भरण्यात यावे.

(x) एखादा उमेदवार वेतनगट १ मधील नेमणूकीसाठी पात्र असेल तर त्याने वेतनगट २, ३ किंवा ४ साठी अर्ज केल्यास त्याचा विचार करण्यास हरकत नाही. परंतू त्याच बरोबर संबंधित उमेदवाराने वेतनगट १ चे पद उपलब्ध झाल्यावर अर्ज केल्यास त्याचा नियमानुसार विचार करण्यात यावा. याचप्रमाणे वेतनगट २ व ३ साठी पात्र उमेदवारांचा विचार करण्यात यावा. मात्र वेतनगट ४, ३ व २ करीता पात्र उमेदवार त्याच्या वरिष्ठ वेतनगटासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. तथापि कोणत्याही वेतनगटामध्ये अर्ज करताना त्या वेतनगटातील पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदींनुसार संबंधित उमेदवाराने अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

## ५. <u>क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी : -</u>

खेळाडूच्या प्रमाणपत्राची पडताळणी त्वरेने होण्याच्या दृष्टीने संबंधित खेळाडू, संबंधित खेळ संघटना, संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा व संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

i) **<u>संबंधित खेळाडूने करावयाची कार्यवाही : -</u>**
साधारणपणे खेळाडूने खेळविषयक प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सदरचे प्रमाणपत्र छाननी करण्यासाठी खेळाडू ज्या विभागात वास्तव्यास आहे त्या विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे पाठवावे. मात्र परीक्षार्थी खेळाडू उमेदवाराने संबंधित पदाच्या निवडीकरिता पूर्व परीक्षा अथवा मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करावयाच्या दिनांकाआधी किंवा एकाच टप्प्यावर आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षेसाठी सादर करावयाच्या अर्जाच्या अंतिम दिनांकाआधी, तो ज्या क्रीडा विभागात वास्तव्यास आहे. त्या विभागातील संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केलेला असणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडूने कोणाच्या विभागातील उपसंचालक क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणसाठी अर्ज सादर केला आहे हे आवेदन अर्जात नमूद करणे तसेच त्याची पोच पावती सोबत जोडणे आवश्यक आहे. उपसंचालक क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून आधीच प्रमाणपत्र पडताळणी करून घेतलेल्या उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील. ज्या पदावरील निवडीसाठी उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते अशा पदांच्या मुलाखतीवेळी संबंधित खेळाडूकडे क्रीडा प्रमाणपत्राच्या पात्रतेचा अहवाल असणे आवश्यक आहे.

ii) **संबंधित खेळाच्या अधिकृत संघटना /संबंधीत संस्था यांनी करावयाची कार्यवाही : -**

अधिकृत एकविध संघटनेच्या प्रमाणपत्राची छाननी तसेच आदिवासी, अपंग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या प्रमाणपत्राची छाननी संबंधित विभागीय उपसंचालक यांना करता यावी याकरिता संबंधित स्पर्धा आयोजकांनी स्पर्धेचे आयोजन झाल्यापासून ३० दिवसांमध्ये त्या स्पर्धेतील खेळाडूंचे संपूर्ण अभिलेख व्यवस्थितरीत्या जतन करून संबंधित संघटनेच्या विद्यमान अध्यक्ष / सचिव यांच्या स्वाक्षरीने स्थायी प्रत सर्व विभागीय उपसंचालक व क्रीडा संचालनालयाकडे पाठविणे आवश्यक राहील सदर अभिलेख संबंधित उपसंचालक यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास संबंधित संघटनेस विभागीय उपसंचालक ७ दिवसांत अभिलेख सादर करण्याबाबत सूचित करतील. तसेच संबंधित स्पर्धा आयोजन करणाऱ्या संस्था/ क्रीडा संघटना/ संबंधित शासकीय विभाग यांनी प्राविण्य निश्चितीच्या अनुषंगाने पुरावे विहित नमुन्यात उपसंचालक, क्रीडा यांनी वेळोवेळी विचारणा केल्यानुसार ७ कार्यालयीन दिवसांच्या कालावधीत ई-मेल द्वारे प्रत्यक्ष अथवा तात्काळ डाकेने पोहोच करावेत. या मुदतीतही अहवाल प्राप्त न झाल्यास संबंधित विभागीय उपसंचालक यांना संबंधित खेळाडूला त्याच्या प्रमाणपत्राचा पडताळणी अहवाल पाठविता येणे शक्य होणार नाही व यामुळे खेळाडूच्या होणाऱ्या नुकसानीस संबंधित खेळ संघटनाच जबाबदार राहील.

iii) **संबंधित उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा यांनी करावयाची कार्यवाही : -**

उपसंचालक क्रीडा व युवक सेवा यांना खेळाडू प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यानी ३ कार्यालयीन दिवसात संबंधित स्पर्धा आयोजन करणाऱ्या संस्था / क्रीडा संघटना/ शासकीय कार्यालये यांच्याकडून प्राविण्य निश्चितीसाठी आवश्यक अभिलेख मागवावा. तद्नंतर स्पर्धा आयोजन करणाऱ्या स्पर्धा संस्था /क्रीडा संघटना/ संबंधित शासकीय विभाग यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर सदर अहवालाआधारे उपसंचालक क्रीडा व युवक सेवा यांनी ८ कार्यालयीन दिवसात कार्यवाही करून प्रमाणपत्र देण्याची अथवा नाकारण्याची कारणे नमूद करून संबंधित खेळाडूंना अवगत करण्याची कार्यवाही करावी. खेळाडूचे प्रमाणपत्र पडताळणीसाठी उपलब्ध झाल्यानंतर कार्यालयीन कामाकाजाच्या ३० दिवसात प्रमाणित करून संबंधित खेळाडूस प्रमाणपत्र पडताळणी अहवाल उपलब्ध करून देणे उपसंचालक क्रीडा व युवक सेवा यांच्यावर बंधनकारक राहील. सदरचा अहवाल / निर्णय उपसंचालक क्रीडा यांच्या संकेतस्थळावर अपलोड करावा. त्यामुळे भविष्यात खेळाडूच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र पडताळणीबाबत विचारणा झाल्यास त्यांना तात्काळ उपलब्ध करून देता येईल. भविष्यात सदर खेळाडूपैकी निवड झालेल्या खेळाडूंच्या प्रमाणपत्र पडताळणीस झालेल्या विलंबामुळे नियुक्ती देण्यास उशीर झाल्यास अथवा न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास उपसंचालक क्रीडा यांना जबाबदार धरून त्यांच्या विरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

iv) **सेवाप्रवेश विभागाने करावयाची कार्यवाही :-**

खेळाडू प्रवर्गातून प्राप्त झालेल्या अर्जासोबत योग्य त्या क्रीडाप्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीकरिता केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास परीक्षेच्या पहिल्या टप्प्यातच अर्ज नाकारण्यात यावेत. तसेच परीक्षेसाठी खेळाडू प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी काही खेळाडू भविष्यात खेळाडू प्रवर्गासाठी अपात्र ठरण्याचा संभव लक्षात घेता खेळाडू प्रवर्गातील पदसंख्येपेक्षा पुरेशा अतिरिक्त उमेदवारांची गुणानुक्रमाने निवडीच्या व उपसंचालकांच्या प्रमाणपत्र पडताळणीच्या अहवालाच्या अधीन राहून तात्पुरती निवड करण्यात यावी. ज्या पदांवरील निवडीसाठी उमेदवाराची मुलाखत घेण्यात येते अशा पदांच्या मुलाखतीवेळी संबंधित खेळाडूकडे क्रीडा प्रमाणपत्राच्या पात्रतेचा अहवाल असणे बंधनकारक आहे. निवड प्राधिकाऱ्यांनी खेळाडू प्रवर्गातील नियुक्तीसाठी पात्र असल्याबाबत खेळाडूने आवेदन अर्जासोबत सादर केलेल्या सर्व माहितीसह परीक्षेचा निकाल संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना कळवावा.

v) **नियुक्ती अधिकाऱ्यांनी करावयाची कार्यवाही:-**

सेवाप्रवेश विभागाकडून निवड केलेल्या खेळाडूंच्या प्रमाणपत्रांबाबतचा अहवाल संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून मागवून घ्यावा व त्यानुसार खेळाडू प्रवर्गासाठी पात्र खेळाडूंना सेवाप्रवेश विभागाने निश्चित करून दिलेल्या गुणवत्ता क्रमांकनुसार नियुक्ती द्यावी. खेळाडूने पदाच्या जाहिरातीनंतर सादर केलेल्या आवेदन अर्जात नमूद केलेल्या खेळातील, स्पर्धेतील आणि स्पर्धा कालावधीतील, खेळाडू पात्रतेचा अहवाल असल्याखेरीज, नियुक्ती अधिकाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत खेळाडू उमेदवारास नियुक्ती अथवा प्रशिक्षण देऊ नये. तथापि, यानुसार कार्यवाही न केल्याने भविष्यात न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याकरिता संबंधित नियुक्ती अधिकारी जबाबदार राहतील.

vi) संबंधित विभागीय उपसंचालक यांच्यामार्फत कळविण्यात आलेल्या निर्णयावर खेळाडूला आक्षेप असल्यास याबाबत खेळाडूस निर्णय प्राप्त झाल्यापासून २ महिन्यांच्या आत सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी, पुणे यांच्याकडे प्रथम अपील करता येईल. प्राप्त होणाऱ्या अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय देण्याची कार्यवाही सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा हे करतील. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या निर्णयावर आक्षेप असल्यास आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे द्वितीय अपील करता येईल.

vii) संबंधित विभागीय उपसंचालक यांनी पडताळणी केलेल्या प्रमाणपत्राची माहिती क्रीडा विभागाच्या संकेत स्थळावर अपलोड करावी. जेणेकरून संबंधित खेळाडूने नोकरीकरिता अर्ज केलेल्या संबंधित विभागास सदरचे प्रमाणपत्र संकेत स्थळावरील माहितीशी पडताळून पाहता येईल.

viii) एखाद्या खेळाडूकडे एका पेक्षा जास्त खेळांची राज्य / राष्ट्रीय स्पर्धांची प्राविण्य प्रमाणपत्रे असू शकतील अशा खेळाडूने एकाच वेळेस सर्व प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता संबंधित उपसंचालक यांच्याकडे सादर करणे गरजेचे आहे. संबंधित पदाच्या भरतीसाठी सादर केलेल्या अर्जात, खेळाडूने जे प्रमाणपत्र / प्रमाणपत्रे उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांना पडताळणीसाठी सादर केली असल्याचा दावा केला असेल केवळ त्याच प्रमाणपत्रांच्या पात्रतेचा अहवाल नियुक्तीच्या पुढील प्रयोजनार्थ गृहीत धरला जाईल या तरतुदीखेरीज अन्य खेळातील आणि परीक्षेच्या अन्य कोणत्याही टप्प्यावर सादर करण्यात येणारे खेळाडू प्रमाणपत्र पडताळणी अहवाल कोणत्याही परिस्थितीत ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

ix) क्रीडा अर्हतेनुसार संबंधित पदाच्या भरतीसाठी जाहिरात आल्यास अर्ज करताना खेळाडूने उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणी करून मिळण्याबाबत केलेल्या अर्जाची पोच पावती अथवा या पूर्वी खेळाडूस उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्र पडताळणी अहवाल जोडणे बंधनकारक आहे. अर्जासोबत उपरोक्त तपशील सादर न करणाऱ्या उमेदवारांचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही.

x) यापुढे वेतनगट १, २, ३ व ४ मधील पदांच्या सरळसेवा भरतीकरीता सदर कार्यपध्दती लागू राहील.

## ६. सरळसेवा भरतीबाबत करावयाची कार्यवाही : -

**(i)** ५ टक्के आरक्षणांतर्गत क्रीडा संवर्गातून वेतनगट १, २, ३ व ४ मधील पदांच्या भरतीसाठी जाहिरात देतांना परिच्छेद क्र. १, २ व ३ मधील तक्त्यांमध्ये नमूद असलेल्या पात्र स्पर्धांचा/ खेळांचा उल्लेख जाहीरातीमध्ये करण्यात येईल.

**(ii)** खेळाडूंच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करतांना अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग, खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील त्या त्या प्रवर्गातील ५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतील.

**(iii)** खेळाडूंचे आरक्षण समांतर आरक्षण राहिल व ते कार्यान्वित करण्यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. एआरव्ही-२०१७/प्र.क्र.३१/९८/१६-ब, दि.१६.०३.१९९९ मधील मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये शासनाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

**(iv)** खेळाडूंसाठी विहीत करण्यात आलेले ५ टक्के आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

(v) खेळाडू आरक्षण हे समांतर आरक्षण / विशेष आरक्षण असल्यामुळे आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करतांना तसेच भरतीची जाहिरात देतांना त्या जाहिरातीत खेळाडू आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या सामाजिक आरक्षण उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा, अ.ज, वि.जा.(अ), भ.ज.(ब), (क), (ड), वि.मा.प्र., इमाव, खुला प्रवर्ग) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी. सदर आरक्षणाकरीता क्रीमीलेअर ची अट लागू राहणार नाही. (*शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. १८.०८.२०१६ नुसार*)

(vi) क्रीडा प्रमाणत्राची पडताळणी करण्यासाठी संबंधित विभागाच्या आयुक्त/ संचालक क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे पत्रव्यवहार करण्याची आवश्यकता नाही. प्रमाणपत्राबाबत काही शंका असल्यासच आयुक्त / संचालक क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे विचारणा करावी.

७. **नियुक्ती अधिकारी : -**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कर्मचारी सेवाविनियम -२००५ मधील तिसऱ्या अनुसूची मध्ये विहीत करण्यात आलेले नियुक्ती अधिकारी राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना नियुक्ती देण्यास सक्षम असतील.**

*********